अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, ठाणे यांच्या कार्यालयातील कामांना तसेच, जिल्हा परिषद सांगली अंतर्गत कामांना देखभाल व दुरुस्ती लेखाशिर्षामधून निधी वितरीत करण्याबाबत.

लेखाशिर्ष-२०५९ ४५३१ (योजनांतर्गत)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०१८/प्र.क्र.५२ /बांधकाम-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: २६ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७.
३) शासन निर्णय क्र. योजना-२०१७/प्र.क्र.८५/बांधकाम-४ , दिनांक ०५.१२.२०१७.
४) शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८.
५) अधिक्षक अभियंता, प्रमंग्रासयो, ठाणे यांचे जा.क्र./अअ/प्रमंग्रासयो/मग्रारविसं /कोवि/१८२, दि.०८.०२.२०१८ चे पत्र.
६) शासन निर्णय संकीर्ण -२०१८/प्र.क्र.३९ /बांधकाम-४, दिनांक ०७.०३.२०१८.
७) शासन निर्णय संकीर्ण -२०१८/प्र.क्र.५७ /बांधकाम-४, दिनांक १२.०३.२०१८.
८) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सांगली यांचे जा.क्र/जिपसा/बांधकाम/रेशा-१/ १३००/२०१८, दि.२१.०३.२०१८.

प्रस्तावना:-

अधिक्षक अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो. ठाणे यांच्या कार्यालयात दिनांक १८.११.२०१७ रोजी आग लागली. या आगीमुळे त्यांच्या कार्यालयाचे व आगीच्या झळीमुळे कार्यालयातील कागदपत्रांचे नुकसान झाले. अधिक्षक अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो. ठाणे यांनी त्यांच्या दिनांक ०८.०२.२०१८ च्या पत्रान्वये याबाबत झालेल्या हानीचा प्राथमिक अहवाल सादर केला असून, हानी झालेल्या कार्यालयातील संपुर्ण विद्युतीकरणाचे नुतनीकरण व स्थापत्य दुरुस्तीचे कामाकरीता रु.१९.७० लक्ष निधी मिळावा अशी विनंती अधिक्षक अभियंता,प्र.मं.ग्रा.स.यो. ठाणे यांना केली आहे. त्याचप्रमाणे, कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद सांगली यांच्या दिनांक २१.०३.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा

परिषद सांगली अंतर्गत विविध कामांच्या दुरुस्तीकरीता रू. ११५.०० लक्ष निधी मिळावा अशी विनंती केली आहे.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता संपूर्ण अर्थसंकल्पास मंजुरी मिळाली असून जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी एकूण रू.२०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित झालेली आहे. त्यापैकी, मंजूर तरतूदीच्या ८० टक्के मर्यादेत लेखाशर्ष-२०५९ ४५३१ (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत खर्च भागविण्याकरीता वित्त विभागाने रू.१६.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिली आहे. सदर तरतुदीपैकी एकूण रक्कम रु. ११.१९ कोटी इतके सहायक अनुदान माहे डिसेंबर, २०१७ व मार्च २०१८ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आले आहे. शिल्लक तरतुदीतून जिल्हा परिषद, ठाणे यांना रु.१९.७० लक्ष व जिल्हा परिषद, सांगली यांना रु.५५.७० लक्ष असे एकूण रु.७५.४० लक्ष इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भीय दिनांक १८.०४.२०१७ , दिनांक ३०.०६.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या अधीन राहून, जिल्हा परिषद, ठाणे यांना रु.१९,७०,०००/- (एकोणीस लक्ष सत्तर हजार फक्त) व जिल्हा परिषद, सांगली यांना रु.५५,७०,०००/- (पंचावन्न लक्ष सत्तर हजार फक्त) असे एकूण रु. ७५,४०,०००/- (पंच्याहत्तर लक्ष चाळीस हजार फक्त) इतके सहायक अनुदान खालील कामांना माहे मार्च, २०१८ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे व जिल्हा परिषद, सांगली यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	जिल्हा परिषदेचे नांव	कामाचे नांव	वितरीत करावयाचा निधी
१	ठाणे	अधीक्षक अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., ठाणे व कार्यकारी अभियंता, प्रमंग्रायो, ठाणे, कार्यालयास विद्युतीकरण नुतनीकरण करणे.	६०५०००.००
२	ठाणे	अधीक्षक अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., ठाणे कार्यालयातील संगणकासाठी वातानुकूलन यंत्रे बसविणे.	४६५०००.००
३	ठाणे	अधीक्षक अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., ठाणे कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, ठाणे कार्यालयातील स्थापत्य दुरुस्तीचे कामे करणे.	९०००००.००
		(अ) एकूण (जि.प.ठाणे)	**१९७००००.००**

अ. क्र.	जिल्हा परिषदेचे नांव	कामाचे नांव	वितरीत करावयाचा निधी
४	सांगली	स्टोअर शेड इमारत सांगली (प्र.मं.ग्रा.स.यो.कार्यालय)	२०००००.००
५	सांगली	विश्रामगृह सांगली (दुमजली शेतकरी निवास व उपहारगृह)	५७०००००.००
६	सांगली	विश्रामगृह इमारत पं.स शिराळा	५०००००.००
७	सांगली	विश्रामधाम पं.स इस्लामपूर ता.वाळवा	५०००००.००
८	सांगली	विश्रामगृह इमारत खानापूर	५०००००.००
९	सांगली	विश्रामधाम पं.स तासगाव	५०००००.००
१०	सांगली	विश्रामगृह इमारत पं.स.कवठेमहांकाळ	५०००००.००
११	सांगली	विश्रामगृह इमारत पं.स. जत (जुने)	५०००००.००
		(ब) एकूण (जि.प. सांगली)	**५५७००००.००**
		एकूण (अ)+(ब)	**७५४००००.००**

२. या प्रकरणी, इमारती देखभाल दुरुस्ती संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने विहीत केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच, यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे मंजूरीबाबत जी कार्यपध्दती अवलंबिण्यात येत होती, तीच कार्यपध्दती अवलंबून कामे मंजूर केल्याची, तसेच, शासकीय इमारतींच्या दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्रस्तुत मंजूर कामे पुर्ण झाल्याची खातरजमा करुनच संबंधितांस देयकाची अदायगी करण्यात यावी. याबाबतचे दुरुस्ती पुर्वीचे व नंतरचे फोटो जतन करुन ठेवण्यात यावेत.

३. या कामांकरीता होणारा खर्च मागणी क्र. एल-३ "२०५९, सार्वजनिक बांधकामे, ८०-सर्वसाधारण, १९६ जिल्हा परिषदा/जिल्हा स्तरीय पंचायत समितींना सहाय्य (०१) स्थानिक (स्तर) क्षेत्रातील योजना, (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये इमारतींच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान, २७ लहान बांधकामे, (२०५९ ४५३१) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठीसाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे ज्या कामाच्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करुन, सदर सहाय्यक अनुदानाच्या विनियोजना संबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल, संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवून त्याची प्रत या विभागाकडे पाठविण्याची जबाबदारी संबधित मुख्य वित्त व लेखाअधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच सदर अनुदानाच्या विनियोजना संबधी महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत तसेच, संबंधित जिल्हा परिषदेने कोण-कोणत्या कामावर निधी खर्च केला याचा तपशिल शासनास विनाविलंब सादर करावा.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/ अर्थसंकल्प -३, दि. १८.०४.२०१७ , शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थसंकल्प -३, दि. ३०.०६.२०१७ व शासन परिपत्रक, वि.वि. क्र. अर्थसं २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ मधील अटी-शर्तीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०३२६१००९०६३९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.03.26 12:30:07 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२. मा. सचिव (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२
३. विभागीय आयुक्त, पुणे, कोकण
४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र - १ मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सांगली.
६. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,ठाणे, सांगली.
७. अधिक्षक अभियंता, प्रमंग्रासयो, ठाणे.
८. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, सांगली.
९. कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद, ठाणे, सांगली.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, सांगली.
११.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा, ठाणे, सांगली.
१२.उपमुख्य लेखा परिक्षक, जिल्हा, ठाणे, सांगली.
१३.कार्यासन अर्थ ४ , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१४.वित्त विभाग (व्यय- १५ , व्यय- ११,अर्थोपाय, अर्थ-३) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५.कार्यासन अधिकारी- वित्त-१, वित्त-७ व वित्त-१० ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१
१६.निवडनस्ती- बांधकाम-४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१